REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रियांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कर्तबगारीचा अभ्यास



**डॉ. सौ. रंगरेज आयेशा एम**[१]**. सादिकअ. तय्यब साहेबलाल शेख**[२]
[१]**कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.**
[२]**कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,सोलापूर.**

**सारांश**

*इतिहास या विषयात सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील पूर्वी पासून विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तबगार स्त्रियांचा उल्लेख अभ्यासक्रमात मोठया प्रमाणत नसल्यामुळे त्यांच्या कर्तबगारीचा ठसा समाजासमोर आणण्यासाठी विशेषतः मुस्लिम धर्मामध्ये बऱ्याच स्त्रिया शिक्षणपासून आणि कर्तव्यापासून वंचित राहिल्या असल्यामुळे अशा समाजातील स्त्रियांसमोर एक आदर्श निर्माण करणे गरजेचे आहे. मध्ययुगीन काळखंडात सर्वसामान्य स्त्रियांची स्थिती दयनीय होती मग तशीच स्थिती राजघराण्यातील स्त्रियांची पण होती का ? त्यांना पण विविध बंधने होती का ? त्यानां शिक्षणाचे अधिकार होते का ? ही सर्व माहिती जाणून घेण्यासाठी तसेच या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांनी इतर सर्वसामान्य स्त्रियांच्या शिक्षणाविषयी व त्यांच्या हक्का विषयी काही प्रयत्न केले आहे का ? हे पाहण्याच्या जिज्ञासेपोटी संशोधकाने सदर संशोधन हाती घेतले आहे.*

*सदर संशोधनासाठी संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दतीची निवड केली असून आधारसामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतातील संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोष, क्रमिक पाठयपुस्तके, वर्तमानपत्रे व नियतकालिके याद्वारे माहितीचे संकलन करून त्या माहितीचे विश्लेषण केले आहे. संकलित माहिती व तिच्या विश्लेषणावरून संशोधकाने निष्कर्ष मांडले आहेत.*

*सुलतानशाहीतील मुस्लिम स्त्रिया या काही प्रमाणात शिक्षीत होत्या. सुलतानशाहीतील मुस्लिम स्त्रियांना दिले जाणारे शिक्षण हे धार्मिक स्वरुपाचे होते. सुलतानशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना जरी समाजात मान असला तरी राज्य कारभार चालविण्यास विरोध होता. सुलतानशाही राजघराण्यातील स्त्रियांना घरीच शिक्षण दिले जात होते.*

**मुळशब्दः-** सुलतानशाही, मुघलशाही, राजघराणे, स्त्रिया, कर्तबगार

## प्रस्तावना :-

स्त्रीचा गतकाळ म्हणजे प्राचीन , मध्ययुगीन आणि आधुनिक काळ . या काळात स्त्रीला फक्त उपभोगाची वस्तू म्हणून त्याच्याकडे पाहिले जाई. या काळात प्रातःकाळी (पहाटे ) लवकर उठून साफ-सफाई करणे, जात्यावर ज्वारी दळणे, स्वंयपाक करणे, धुणी- धुणे, भांडी घासणे, मुलांना अंघोळ घालणे, त्यांना घास भरवणे , त्यांच्यासाठी अंगाई गाणे, गोष्टी सांगणे, घरातील इतर मंडळींचा मान राखणे, त्यांची देखभाल करणे, शेतातील कामे करणे इ. कामे ती नित्य नियमाने न चुकता करत होती .

पण इतके कामे करून ही तिला घरात, समाजात मान-सन्मान नव्हताच त्यांना कोणत्याही कार्यक्रमात पुढाकार नव्हता ना कोठे ही त्यांना व्यक्ति स्वांतत्र्य किंवा विचार स्वातंत्र नव्हते फक्त तिला एका दासी प्रमाणे घरातील कामे करणे, मुले संभाळणे आणि मुलांना जन्म देणे या कामाव्यतिरिक्त त्यांना दुसऱ्या कोणत्या ही कामात आवड असली तरी ती त्यांना करता येत नसे. कारण स्त्रीला घरात, समाजात दुय्यम स्थान होते , त्याला हीन समजले जाई , दासी म्हणून संबोधले जात असे. स्त्री म्हणजे फक्त उपभोगाची वस्तू असा गैरसमज होता. मग स्त्रियांनी इतर विविध क्षेत्रात आपली कर्तबगारी दाखवणे दुरच.

प्राचीन काळ पाहिला तर या काळात राजेशाही होती त्या काळात स्त्रियांना जास्त जाचक अशा अटी नव्हत्या. त्यांना थोडेफार स्वातंत्र्य होते. पडदा पध्दती नव्हती , जाचक असे नियम-नियमावली नव्हती, त्यांना थोडे फार महत्व होते. मातृसत्ताक कुटूंब प्रणाली अस्तित्वात होती.

**सुलतानशाहीचा उगम :-**

भारतीय इतिहासाच्या मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम सत्ताधिशाच्या अभ्यासाच्या दृष्टीने दोन भाग पडतात, पहिला भाग इ.स.१२०६ ते १५२६ व दुसरा भाग इ.स.१५२६ ते १८१८ , त्यापैकी इ.स. १२०६ ते इ.स १५२६ हा काळ 'सुलतानशाही' चा काळ म्हणून ओळखला जातो. कारण या काळातील मुस्लिम शासकांनी स्वतःला **'सुल्तान'** अशी उपाधी लावली होती. सुलतानशाहीच्या ३२० वर्षाच्या कालखंडात गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे, सय्यद घराणे आणि लोदी घराणे यांनी भारताच्या विविध प्रदेशावर राज्य केले.

**सुलतान शाहीतील स्त्रिया**

१) शमसुद्दीन अल्तमशची पत्नी शाहतुर्कन
२) शमसुद्दीन अल्तमशची मुलगी रझिया बेगम (इ. स. १२३६ ते १२४०)

- **सुलतानशाहीतील स्त्रियांची स्थिती :-**

स्त्रियांचा सामाजिक दर्जा कोणत्याही काळात चांगला नव्हता. तिला पुरुषांनी कधीही आपल्या बरोबरीचा दर्जा दिला नाही. कुटुंबाची जबाबदारी पार पाडणे हे महत्वपूर्ण कर्तव्य असल्याने सुलतानशाहीत सामाजिक क्षेत्रात, विद्वतेच्या क्षेत्रात, राजकारणात स्त्रियांनी भरीव कामगीरी केल्याचे दिसत नाही. 'चूल आणि मूल' हे स्त्रिचे खऱ्या अर्थाने कार्यक्षेत्र होते. सुलतानशाहीतील समाजावर उलेमा, मौलवींचा प्रभाव असल्याने स्त्रियांना फारसे स्वातंत्र्य मिळाले नाही. पण ह्या सर्व गोष्टींना रझिया सुलतानचा अपवाद होता. अल्तमशची मुलगी असल्याने तिला एखाद्या राजपुत्राप्रमाणे शिक्षण मिळाले. घोडस्वारी, तलवारबाजी, युध्दकौशल्ये असे लष्करी शिक्षणही मिळाले पण लवकरच तिला विविध स्तरातून विरोध होऊ लागला. पुरुषांसारखा वेश घालणे, पडदा न घेणे इत्यादी . रझियाच्या गोष्टी म्हणजे धर्म विरोधी मानल्या गेल्याने कट्टर धर्मनिष्ठ तिच्या विरोधात गेले. महत्वाचे कारण म्हणजे स्त्रीने आपल्यावर हुकुमत गाझवावी हे अमीर सरदारांना मानवले नाही. त्यातच रझियाचा बळी गेला. स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन कसा होता. याची त्यावरुन कल्पना येते.

- **सुलतानशाहीतील शिक्षण :-**

सुलतानशाहीच्या एकूण कालखंडात शिक्षणाच्या दृष्टीने फारसे कार्य झाल्याचे दिसत नाही. कदाचित आपल्या शत्रुंशी विरोधकांनी लढण्यातच सुलतानांची व प्रांतीय राज्यपालांची शक्ती खर्च होत असल्याने विद्यावर्धनाकडे त्यांना लक्ष देता आले नाही. सुलतानशाहीत धर्माला महत्व असल्याने मुस्लिमांना दिले जाणारे शिक्षण धार्मिक स्वरुपाचे होते. साधारणतः प्रत्येक मशिदीला जोडून मदरसा असे आणि तेथे मुस्लिम मुलांना कुराण शरियत यांचे धडे देण्याचे कार्य मौलवी करीत.

- **सुलतानशाही काळातील राजकिय, सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया :-**

त्या काळात स्त्री-पुरुषात स्वतंत्रपणे सामाजिक संपर्क (व्यवहार) नव्हता. उच्च व मध्यमवर्गीय स्त्रियांना नृत्य व संगीतात मौजमजा करण्यावर प्रतिबंध होते. तथापी शाही घराण्यातील व अभिजात वर्गातील काही स्त्रियांनी राजकीय सत्तेचा वापर केल्याचे उदाहरण दिसते.अल्तमश नंतर रुकनुद्दीन फिरोजला सत्ता प्राप्त करुन देण्यात त्याची आई शाहतुर्केनचा प्रभाव होता. रझिया सुलतानने तर जनतेच्या संमतीने रुकनुद्दीन फिरोजची सत्ता समाप्त करुन गादी प्राप्त केली असे तिचे व्यक्तीमत्व होते. सुलतान कैकुबादवर मलिक निझामुद्दीनच्या पत्नीचा मोठा प्रभाव होता. तिने सुलतानच्या 'हरेम' ला आपल्या नियंत्रणाखाली आणल्याचा उल्लेख डॉ. चिटणीस यांनी केला आहे.

- **मुघल साम्राजाची स्थापना :-**

झहीरउद्दीन बाबर याचा जन्म १४८३ मध्ये झाला. आईकडून चेंगीझखानाच्या व वडिलांकडून तैमुरलंगाच्या वंशाच्या घराण्यात त्याला जन्म मिळाल्यामुळे या दोन्ही घराण्यांचा बरा-वाईट वारसा त्याला मिळाला होता. वयाच्या ११ व्या वर्षी मध्य आशियातील तैमुर घराण्याच्या उर्वरीत छोट्या फरगाणा या राज्याच्या गादीवर तो आला. युवावस्थेत त्यास संघर्षाचे अनेक रोमहर्षक प्रसंग अनुभवावयास मिळाले. तैमुरच्या साम्राज्याची राजधानी समरकंद जिंकणे ही त्याची महत्वाकांक्षा होती. त्याने दोनदा समरकंद जिंकले परंतू उझबेक टोळीवाल्यामुळे ते राखता आला नाही. निराश होऊन तो काबुलचे छोटे राज्य हिंदूस्थानात येण्यापूर्वी वीस वर्षे सांभाळत होता.

- **मुघल कालीन स्त्रियांची स्थिती :-**

मध्ययुगातील द्वितीय काल विभाग (इ.स.१५२६ ते इ.स. १७०७) हा मुघल बादशाहीचा काळ मानला जातो. या काळात स्त्रियांना समाजात निम्न दर्जा होता असे दिसते. ज्या वेळी मध्ययुगीन अरबी प्रदेशात स्त्रिया समाज व राजकारणात मोठ्या प्रमाणात स्वांतत्र्याचा उपभोग घेत होत्या त्यावेळी भारतातील मुस्लिम स्त्रियांना समाजातील कनिष्ठ दर्जामध्ये समाधान मान्य करावे लागले. ही परिस्थीती काही मुद्याच्या

अंतर्गत स्पष्ट होईल.

- **मुघल कालीन स्त्रीशिक्षण :-**

मुघल सम्राटांना साहित्यात रुची असल्याने त्यांनी आपल्या मुलांच्या विशेषतः मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. सम्राट अकबराने स्वतःचे शिक्षण फारसे झाले नव्हते तथापि त्यांने राजघराण्यातील राजकन्या व स्त्रियांच्या शैक्षणिक कार्यात रुची घेतली. त्याने फत्तेपूरसिक्रित एक मुलीसाठी शाळा सुरु केली व शिक्षकांची नेमणूक केल्याचा उल्लेख दिसतो. अकबराच्या काळात आलेल्या मॉन्सरेटने लिहले आहे की, अकबराने राजकन्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले त्यांना लिहणे, वाचणे, शिकविले जात. वृध्द स्त्रिया त्यांना इतर व्यावहारिक गोष्टी शिकवित. औरंगजेबाबाबत बख्तावर खान लिहीतो "औरंगजेबाने त्याच्या नशीबवान अपत्यांना फार उदार शिक्षण दिले आहे. त्याच्या आदेशानुसार घरातील स्त्रियांनी देखील धर्माची मुलभूत व आवश्यक तत्वे जाणून घेतली आहेत." मुघल राजकन्यांना महालातच शिक्षण देण्याची व्यवस्था केली जात असे हे कार्य साहित्यात निपुन शिक्षका किंवा वृध्द शिक्षक करीत. बहुतेक ही शिक्षिका म्हणजे दाई ही असून तिला अतून किंवा अतूनममा असेही म्हणत. अशा प्रकारच्या काही अतुन ममांचा उल्लेख गुलबदन बेगमने "हुमायुन नामा" मध्ये केला आहे. राजपुत्री जहानआराची शिक्षिका विदुषी फारशी स्त्री सती-उन-निसा असून ती कुराण अतिशय चांगल्या पध्दतीने व क्रमवारी सांगत असे. ती विद्वान व वैद्य कुटुंबातील होती. राजपुत्री झेब-उन-निसाने हाफिज मरियम बीबीकडून शिक्षण घेतले. शिवाय तिने मियाबाई कडून अरबी, गणित, व जोतिषशास्त्राचे शिक्षणही घेतले. मुघल काळात राजघराण्यातील स्त्रियांना गद्य, पद्य, सामाजिक शास्त्र, धर्मशास्त्र, फारसी व अरबी भाषाचे शिक्षण दिले जात असे. मुघल स्त्रियांसाठी तुर्की भाषेचा वापर दैनंदिन जीवनात होत असे तर हिंदू स्त्रिया हिंदी व इतर प्रादेशीक भाषांचा वापर करीत. फारसी भाषा हि कविता व साहित्याची भाषा असून त्यावर प्रभुत्व असणे म्हणजे एक मोठे कसब मानले जात. हुमायुन या सम्राटाला खुश करण्यासाठी स्त्रियां ज्ञानाच्या विविध क्षेत्रात परस्पर स्पर्धा करीत.

- **मुघलकालीन राजकरणातील स्त्रिया :-**

मुघल काळात स्त्रियांनी शासन व्यवस्था व राजकिय क्षेत्रात आपले योगदान दिले. हुमायुनच्या आईने मीर कल्कनने रचलेला कट आपला पराकष्ठेचा प्रभाव वापरुन उलटवला आणि आपल्या मुलासाठी गादीचे संरक्षण केले. अकबराची मुख्य दाई माहम अगनाने (इ.स. १५६० ते ६४ इ.स पर्यंत) राज्यावर आपले प्रभुत्व स्थापन केले. जहाँगीरची पत्नी **नूरजहान** ही एक प्रभावी व्यक्तीमत्वाची स्त्री होती. ती राज्याची वास्तविक संचालक म्हणून तिने अकरा वर्षे सत्ता हातात ठेवून प्रतिस्पर्ध्याच्या कट-कारस्थानांना हाणून पाडले. तथापि नुरजहानबाबतचे एक वेगळे वर्णन मुहम्मद यासीन लेखकाने "सोशल हिस्ट्री ऑफ इस्लामिक इंडिया" या ग्रंथात केले आहे. नूरजहान प्रेमळ, पतीव्रता, पतीप्रिय, सांसारिक, काटकसरी, अनाथाची आश्रयदाती, स्त्रियांचे नेतृत्व करणारी या सर्वसंपन्न गुणांमुळे ती एक आदर्श स्त्रियांचे प्रतीक बनली आहे."

सुलतानशाही आणि मुघलशाही या राजघराण्यातील स्त्रियांनी आपली कर्तबगारी दाखवण्यास सुरूवात केली. या स्त्रियांत प्रामुख्याने रझिया सुलतान, नूरजहान, जहानआरा, झिनत-उन-निसा, रोशनआरा, सलिमा सुलतान इ.चा समावेश आवर्जून केला जातो. या राजघराण्यातील स्त्रियांनी अशा भयावह परिस्थितीत देखील विविध क्षेत्रात आपली कर्तबगारी कशी दाखवली व त्यांनी त्याला कसे प्रतिउत्तर दिले याची उत्सुकता संशोधकास लागल्यामुळे संशोधकाने सदर संशोधन विषय हाती घेतला आहे.

**संशोधनाचे शीर्षक :-**

सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रियांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कर्तबगारीचा अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांचा शोध घेणे .
२. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या सामाजिक आणि धार्मिक धोरणांचा अभ्यास करणे.
३. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या राजकिय कर्तबगारीचा अभ्यास करणे.
४. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रिया कर्तबगार होत्या.
२. सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रियां सामाजिक, धार्मिक, राजकिय व शैक्षणिक क्षेत्रात कर्तबगार होत्या.

## संशोधन कार्यपध्दती (Research Method) :-

### संशोधन पध्दतीची निवड :-

सदर संशोधन हे सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रियांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कर्तबगारीचा अभ्यास करण्याशी संबंधीत आहे व समस्येचा संबंध हा भुतकाळाशी निगडीत असल्यामुळे संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दतीची निवड केलेली आहे.

- **आधारसामग्रीचे संकलन :-**

प्रस्तूत समस्येच्या आधारसामग्रीचे संकलन दोन प्रकारे केली आहे. (१) प्राथमिक स्त्रोत व (२) दुय्यम स्त्रोत संकलित आधारसामग्रीचे बाह्य व आंतरिक मीमांसा व्दारे विश्लेषण केले आहे.

सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील स्त्रियांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कर्तबगारीचा अभ्यास असल्याने संशोधकाने संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोष, क्रमिक पाठयपुस्तके, वर्तमानपत्रे व नियतकालिके याद्वारे माहितीचे संकलन करून त्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

### संशोधनाचे निष्कर्ष :-

**उद्दिष्ट क्र.१ सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांचा शोध घेणे .**

१. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाहीतील मुस्लिम स्त्रिया या काही प्रमाणात शिक्षीत होत्या.
२. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाहीचा काळ हा भारतात सत्ता स्थिर करण्यातच गेला त्यामुळे सततची होणारी युध्दे, लढाया, बंडे यांना तोंड देण्यातच सुलतानशाहीतील राजे व्यस्त होते. त्यामुळे सहाजीकच राजघराण्यातील स्थिती ही धगधगतीच होती. त्यामुळे स्त्रियांवर वेळोवेळी दडपण आल्यामुळे हुशारी किंवा कर्तबगारी त्यांना दाखवता आली नाही.
३. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, रझिया सुलतान ही एक स्त्री असून सुध्दा ती दिल्लीच्या गादीवर एक कर्तबगार राज्यकर्ती म्हणून आली.
४. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, रझिया सुलतान हि सुलतानशाहीतील एक कर्तबगार स्त्री होती .
५. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाहीतील मुस्लिम स्त्रिया या काही प्रमाणात शिक्षीत होत्या.
६. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाहीतील बादशहा हुमायून पर्यंतचा काळ हा भारतात सत्ता स्थिर करण्यातच गेला त्यामुळे सततची होणारी युध्दे, लढाया, बंडे यांना तोंड देण्यातच मुघलशाहीतील राजे व्यस्त होते. त्यामुळे सहाजीकच राजघराण्यातील स्थिती ही धगधगतीच होती. त्यामुळे स्त्रियांवर वेळोवेळी दडपण आल्यामुळे हुशारी किंवा कर्तबगारी त्यांना दाखवता आली नाही.

**उद्दिष्ट क्र.२ सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या सामाजिक आणि धार्मिक धोरणांचा अभ्यास करणे.**

१. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाहीतील मुस्लिम स्त्रियांना दिले जाणारे शिक्षण हे धार्मिक स्वरुपाचे होते.
२. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना मानाचे स्थान होते.
३. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना धार्मिक शिक्षणा बरोबर तलवार बाजी, घोडेस्वारी व आत्मस्वरंक्षणाचे शिक्षण मिळत होते.
४. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाहीतील मुस्लिम स्त्रियांना दिले जाणारे शिक्षण हे धार्मिक व नैतिक स्वरुपाचे होते.
५. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते.
६. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना धार्मिक शिक्षणा बरोबर तलवार बाजी, घोडेस्वारी व आत्मस्वरंक्षणाचे शिक्षण मिळत होते.
७. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना जरी समाजात मान असला तरी राज्य कारभार चालविण्यास विरोध होता.
८. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळात शैक्षणिक प्रक्रियेत धार्मिक शिक्षण घेणे आवश्यक होते. त्यासाठी कुराणाचे संपूर्ण ज्ञान असणे महत्वाचे मानले जाई. अशातच मेहरुन्निसा उर्फ नूरजहान हिने लहानपणीच कुराणाचे संपूर्ण ज्ञान घेतले होते. यावरुन असे दिसून येते की, त्या काळातील स्त्रियां ज्ञान प्राप्तीत मागे रहात नसत.
९. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल बादशहा औरंगजेबाची मुलगी झेब-उन्-निसा याने वयाच्या सातव्या वर्षी "हाफिसा" ही पदवी प्राप्त केली होती. कारण तिला कुराण तोंडपाठ होते. या गोष्टीचा अभिमान वाटून औरंगजेबने दिल्लीच्या मोठ्या मैदानात सर्व लष्कराला जेवण दिले होते. यावरुन असे दिसून येते की, स्त्री ने शिक्षण घ्यावे त्याने शिकावे म्हणून प्रयत्न व्हायचा व तो यशस्वी झाला

की, आनंद व्यक्त केला जात होता.

**उद्दिष्ट क्र.३ सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या राजकिय कर्तबगारीचा अभ्यास करणे.**

१. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही काळात राजघराण्यातील स्त्रियांना जरी समाजात मान असला तरी राज्य कारभार चालविण्यास विरोध होता.
२. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, रझिया सुलतान हिने आपले राज्य टिकून राहावे म्हणून खूप प्रयत्न केल्याचे दिसून येते.
३. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, रझिया सुलतान हिने आपल्या राज्याबद्दल एकनिष्टता दाखवली .
४. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतान अल्तमश नंतर दिल्लीच्या गादीवर रुकनुद्दीन फिरोजला गादीवर बसविण्यात त्याची आई शाह तुर्केन याचा प्रभाव होता. यावरुन असे दिसून येते की, शाह तुर्केने राजकारणात देखील आपला प्रभाव उत्तम रित्या पाडला होता.
५. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, रझिया सुलतानने तर जनतेच्या संमतीने रुकनुद्दीन फिरोजची सत्ता समाप्त करुन गादी प्राप्त केली. रझिया सुलतान एक स्त्री असून सुध्दा तिने आपल्या राज्यातील लोकांची मने जिंकून दिल्लीची गादी प्राप्त केली होती .
६. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही कालखंडात इ.स. १२३६ मध्ये रझिया सुलतान दिल्लीच्या गादीवर बसली तिला दिल्लीच्या जनतेचा आणि अमिरांचा पाठिंबा मिळाला. परंतू निरनिराळ्या प्रांतातील राज्यपालांनी तिला पाठिंबा दिला नव्हता कारण मुस्लिम साम्राजात एका स्त्रीने राज्य करणे ही गोष्ट नवीन होती. यावरुन रझिया सुलतानने आपल्या युक्तिवादातुन अनेक उदाहरणे अशी दिली कि ज्या स्त्रियांनी राज्यकारभार केला आहे. यावरुन असे दिसून येते कि, रझिया सुलतान ही एक हुशार व कर्तबगार स्त्री राज्यकर्ती होती.
७. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, विविध प्रांताच्या राज्यपालांनी आणि राज्याचा वझीर निजाम उलमुल्क मोहंमद जुनैदी यांच्यात झालेल्या युध्दात रझिया सुलतानने मिळवलेला विजय हा हेच दर्शवतो कि, रझिया सुलतानचे धैर्य धाडस, अचूक निर्णय क्षमता, चांगुलपणा, व वेळप्रसंगी परिस्थितीशी दोन हात करण्याची तयारी. त्या काळी स्त्री मध्ये सुध्दा होती.
८. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील नूरजहान ही उत्कृष्ट राजकारणी व हुशार राज्यकर्ती स्त्री म्हणून ओळखली गेली.
९. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील नूरजहान याने आपल्या कर्तबगारीचा व ज्ञानाचा उपयोग राज्य चालविण्यासाठी केला.
१०. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील नूरजहान ही राजकीय ज्ञानात पारंगत होती.

**उद्दिष्ट क्र.४ सुलतानशाही आणि मुघलशाही यांच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्रियांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.**

१. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही राजघराण्यातील स्त्रियांना घरीच शिक्षण दिले जात होते.
२. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाहीचा कालखंड स्त्रिशिक्षणाच्या दृष्टीने फारसे आग्रेसर असल्याचा दिसत नाही.
३. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाही राजघराण्यातील शिकलेल्या कर्तबगार स्त्रिया आपल्या ज्ञानाचा वापर आपल्या मुलांना शिक्षण आणि धार्मिक शिस्त लावताना उपयोगात आणताना दिसतात.
४. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, राजघराण्यातील काही स्त्रियांनी इतर मुस्लिम स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून मदरसाची स्थापना केली.
५. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, सुलतानशाहीतील नरुद्दीन या धर्मप्रमुखाच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मौलवी लोकांनी बंड केले होते. हे रझिया सुलतानला कळताच तिने ते बंड मोडून काढले यावरुन रझिया सुलतानची धाडसी वृत्ती अचूक निर्णय क्षमता याची जाणीव होते.
६. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाही राजघराण्यातील स्त्रियांना घरीच शिक्षण दिले जात होते.
७. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाहीचा कालखंड स्त्रिशिक्षणाच्या दृष्टीने फारसे आग्रेसर असल्याचा दिसत नाही.
८. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघलशाही राजघराण्यातील शिकलेल्या कर्तबगार स्त्रिया आपल्या ज्ञानाचा वापर आपल्या मुलांना शिक्षण आणि धार्मिक शिस्त लावताना उपयोगात आणताना दिसतात.
९. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल राजघराण्यातील काही स्त्रियांनी इतर मुस्लिम स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून मदरसाची स्थापना केली.
१०. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील बादशहा शहाजहानची मुलगी जहानआरा याने आग्रा येथे जामा मशिदला लागूनच मदरसेची स्थापना केली. यावरुन त्यांनी इतर मुस्लिम स्त्रियांनी शिक्षण घ्यावे म्हणून मोठया प्रमाणत त्यांनी शैक्षणिक कार्य केल्याची माहिती मिळते.
११. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील नूरजहान चित्रकलेत व युध्दकलेत देखील पारंगत होती.

१२. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल काळातील बादशहा औरंगजेबाची मुलगी झेब-उन्-निसा व झिनत-उन्-निसा या उत्कृष्ट कवियत्रि होत्या.

१३. संबंधित साहित्यावरून असे दिसून आले की, मुघल सम्राट बाबरची आई कुतलक-निगार-खानम तुर्की व फारसी भाषेत सुशिक्षित होती. यावरुन त्या काळातील स्त्रियांना बहुभाषेचे ज्ञान होते असे दिसून येते.

## समारोप :-

शाळेत मुलींच्या कर्तबगारीचा शोध घेता यावा म्हणून विविध उपक्रम शाळेने राबवले पाहिजेत. सर्वच स्तरातील स्त्रियांनी शिक्षण घ्यावे यासाठी शासनाने विविध स्तरावर स्त्रि शिक्षणाची सोय उपलब्ध करून त्याची अमंलबजावणी करावी. महिलांना प्रत्येक क्षेत्रात आपली कर्तबगारी दाखवता यावी म्हणून त्यांना प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध करून दयावी. समाजामध्ये स्त्रियांना स्थान प्राप्त करून दयावयाचे असेल तर मातृसत्ताक कुटुंब पध्दतीचा स्विकार करावा लागेल. मुस्लिम समाजामध्ये मुलींच्या शिक्षणास अजूनही दुय्यम स्थान दिले जाते. समाज प्रबोधनाद्वारे शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नाने मुस्लिम समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे.

मुघलशाहीतील नूरजहान यासारख्या राजकिय क्षेत्रातील कर्तबगार स्त्रियांचा समावेश माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात करावा. मध्ययुगीन कालखंडातील सुलतानशाही राजघराण्यातील रझिया सुलताना सारख्या स्त्रीने साम्राज्याची धुरा हाती घेतली तीही स्वतःच्या कर्तृत्वावर. सुलतानशाहीतील रझिया सुलतान यांच्या सारख्या कर्तबगार स्त्रियांचा समावेश माध्यमिक स्तरावरील इतिहास अभ्यासक्रमात करावा. स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती करावी.

## संदर्भग्रंथ सूची :-


१. Lemu, A.B., Heeren, F. (1977) : **Women in Islam,** Aligarh , Crescent Publishing House.
२. Baig, T.,(1991) : **Women of India,** Delhi, Publications Division.
३. Best J.W.,(1995) : **Research in Education,** (9th ed.) Delhi, Ghosh Prakashan.
४. अनुवादक, शर्मा एम.(२००६) : **तुजुक - ए - बाबरी,** नवी दिल्ली, राधा पब्लिकेशन्स.
५. कदम, य.ना.,(२००७), : **समग्र भारताचा इतिहास,** कोल्हापूर, फडके प्रकाशन.
६. काळे, चां.भी.,(२०१३), : **नूरजहान,** दुसरी आवृत्ती, कोल्हापूर,पारिजात प्रकाशन.
७. कोलारकर, श.गो., (२००३) : **भारताचा इतिहास,** कोल्हापूर, श्री मंगेश प्रकाशन.
८. कोलारकर, श.गो., (२००३), : **मध्यकालीन भारताचा इतिहास,** नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
९. गाठाळ, एस.एस., (२०१०), : **दिल्ली सल्तनतचा इतिहास,** औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन्स.
१०. दीक्षीत, नी.सी., (२००३), : **भारताचा इतिहास,** नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
११. पाटील, लि., (१९९०), : **भारतीय स्त्रीजीवन,** पुणे, मेहता पब्लिशर्स.
१२. पाटील, पी., जाधव, एस., (२००७), : **भारतीय इतिहासातील स्त्रिया,** कोल्हापूर, फडके प्रकाशन.
१३. नागोरी, एस.एल.,(२००९), : **मध्यकालीन भारतीय संस्कृती,** जयपूर, पॉयंटर पब्लिशर्स.
१४. ढवळे, प्र.क्र., बारगळ, बा.सा., (१९७१), : **मध्यकालीन भारत,** नागपूर, विद्या प्रकाशन.